## मुंबई विद्यापीठ

क्र.वि.क /५१३/२००८

**परिपत्रक**

- प्राचार्य / संचालक संलग्नित अशासकीय कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षण शास्त्र, अभियांत्रिकी व्यवस्थापन, औषध निर्माणशास्त्र, व तत्सम महाविद्यालये, यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

स्थळ: - मुंबई
दिनांक: - २१ नोव्हेंबर, २००८.

कुलसचिव (करिता)

शासकीय अनुदानित व शासन मान्यता प्राप्त विनाअनुदानित व कायम विना अनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गामधील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीसाठी जाती वैधता प्रमाणपत्र सादर करण्याबाबत.

## महाराष्ट्र शासन

शासन परिपत्रक क्रमांक: - सीबीसी-१२/२००८/प्र. क्र.४२७/मावक-५
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: - ३१ जुलै, २००८.

वाचा: - १) शासन निर्णय, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग कल्याण विभाग, क्रमांक: - सीबीसी-१२/२०००/२५२/प्र. क्र.१/मावक-५, दिनांक २५ जानेवारी, २०००.

२) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक: - इमाव-२००७/प्र. क्र.१५०/मावक-३, दिनांक १७ जुलै, २००८.

३) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक: - इबीसी-२००८/प्र. क्र.१३८/मावक-२, दिनांक १७ जुलै, २००८.

**प्रस्तावना:** - संदर्भ क्रमांक १ वरील या विभागाच्या शासन निर्णय दिनांक २५ जानेवारी, २००० नुसार वैद्यकीय, अभियांत्रिकी, वास्तुशास्त्र व औषध निर्माणशास्त्र या अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गामधील जे विद्यार्थी इयत्ता ११ वी सायन्स शिकत असतील अशा विद्यार्थ्यांची जाती दावा पडताळणीचे प्रस्ताव त्यांच्या संस्थे मार्फत पडताळणी समितीकडे पाठविण्याबाबत विहित कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे. संदर्भ क्रमांक २ व ३ येथील शासन निर्णयानुसार त्यामध्ये नमूद व्यावसायिक अभ्यासक्रमाकरीता तसेच मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्क प्रतिपुर्तीसाठी जाती वैधता प्रमाणपत्राची अट घालण्यात आली आहे. असे जाती दावा पडताळणीचे प्रस्ताव संबंधित शैक्षणिक संस्थेमार्फत विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे सादर करण्यासंदर्भात कार्यपध्दती विहित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक:** - राज्यातील शासनमान्यताप्राप्त शासकीय, अनुदानित, खाजगी विना अनुदानित व कायम विना अनुदानित संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गातील खालील व्यावसायिक अभ्यासक्रमांना (बी. एड. व डी. एड. कोर्स वगळून) प्रवेश घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या जाती दाव्यांची पडताळणीचे प्रस्ताव संबंधित शैक्षणिक संस्थेने त्यांच्या कार्यकक्षेतील विभागीय जात प्रमाणपत्र समिती कडे पाठवावीत.

.....2

अ) आरोग्य विज्ञान पदवी अभ्यासक्रम (वैद्यकीय, दंत, होमिओपॅथी, युनानी, आयुर्वेद, भौतिकोपचार, व्यवसायोपचार व नर्सिंग)

ब) उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत असणारे

| पदविका | पदवी | पदव्युत्तर पदवी |
|---|---|---|
| अभियांत्रिकी | अभियांत्रिकी | एम.बी.ए. |
| औषधनिर्माण शास्त्र | औषधनिर्माण शास्त्र | एम.सी.ए. |
| एच.एम.सी.टी. | एच.एम.सी.टी. | |
| | आर्कीटेक्चर | |

क) कृषी, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागांतर्गत पदविका, पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम तसेच बी.एस.सी. (जैव तंत्रज्ञान).

ड) इ. १० वी ची शालांत परिक्षा ( S.S.C / C.B.S.E व तत्सम ) उत्तीर्ण होऊन महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या पूर्णवेळ अभ्यासक्रमात शिकणारे विद्यार्थी.

इ) "वास्तुशास्त्र" या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांनी इयत्ता १२ वी शिकत असताना ते शास्त्र अभ्यासक्रमाव्यतिरिक्त अन्य अभ्यासक्रमातील असल्यामुळे उदा. वाणीज्य इत्यादी, जाती वैधता प्रमाणपत्र प्राप्त करु न शकलेले विद्यार्थी.

२. वरील अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गातील विद्यार्थ्यांना जाती वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची अट लागू करण्यात येत आहे. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, उच्च व तंत्रशिक्षण विभाग व कृषि व प.दु.म. विभागामार्फत त्यांच्या कार्यकक्षेतील वरील अभ्यासक्रमासाठी मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत जाती वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासंदर्भात प्रचलित असलेले निर्देश / सूचना लागू राहतील.

३. संबंधित विद्यार्थ्यांचे जात प्रमाणपत्र पडताळणीचे प्रस्ताव संबंधित शैक्षणिक संस्थेमार्फत, संस्थेच्या कार्यक्षेत्रात असणाऱ्या विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे खालील कार्यपध्दतीनूसार सादर करणे अनिवार्य राहील.

अ) वरील अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी संबंधित शैक्षणिक संस्थेकडे प्रवेश घेतल्यापासून १ महिन्याच्या आत आवश्यक त्या कागदपत्रांसह परीपूर्ण प्रस्ताव सादर करणे आवश्यक राहील. त्याबाबत शैक्षणिक संस्थेने विद्यार्थ्यांना सुचना दयाव्यात व सुचनांना व्यापक प्रसिध्दी द्यावी.

ब) वरील "अ" प्रमाणे संस्थेकडे प्राप्त झालेले प्रस्ताव, संस्थेने ते प्राप्त झाल्यापासून ८ दिवसाच्या आत संबंधित जिल्हयाच्या विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांचेकडे पाठवावेत.

क) वरील "ब" प्रमाणे प्राप्त झालेले प्रस्ताव विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी संबंधित विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे जसे प्राप्त होतील तसे तत्परतेने वेळच्या वेळी पाठवावेत.

ड) जाती प्रमाणपत्र समितीकडे प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांचे प्रस्ताव समितीने ३ महिन्याच्या आत निकाली काढावेत.

४. विद्यार्थ्यांच्या जाती दावा पडताळणीच्या प्रस्तावाबाबत वर दिलेल्या सूचनांची अंमलबजावणी करण्याबाबत शैक्षणिक संस्थांना आवश्यक त्या सूचना देण्यासाठी वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, उच्च व तंत्रशिक्षण विभाग व कृषी व प.दु.म. विभाग यांनी योग्य ती कार्यवाही करावी. जाती वैधता प्रमाणपत्र प्राप्त झाल्याशिवाय शैक्षणिक शुल्क प्रतिपुर्ती करण्यात येऊ नये.

५. सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून, त्याचा संगणक क्रमांक:- २००८०७३११६१२३४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

सही/-
(एन. आरुमुगम)
सचिव, महाराष्ट्र शासन